पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

जनप्रवास

शनिवार, १० जानेवारी २०१५



# अनाथ चिमुकल्यांचा अनोखा 'डे आऊट'

**मोशी। वार्ताहर**

प्रत्येक चिमुकल्यांचा सुट्टीचा दिवस हा विविध पध्दतीने साजरा होत असतो.अनाथ मुलांना आठवड्याच्या सुट्टीच इतक महत्व नसत.आठवड्याच्या सुट्टीच सुध्दा नियोजन करत धमाल मस्ती करता येते हेही त्यांना माहीत असन दुराफास्तच असत.आशा अनाथ मुलांही सुट्टी एंजॉय करता यावी.इतरां प्रमाणे खेळता बागडता यावे यासाठी एक अनोखा उपक्रम लोणावळा येथील प्रसिद्ध डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टने पुढाकार घेत आयोजित केला होता.या उपक्रमा अंतर्गत अनाथ मुलांची एक दिवसीय सहल विनामुल्य आयोजित करण्यात आली होती .वात्सल्य फाउंडेशन या अनाथ मुलांच्या संस्थेने या उपक्रमाचा लाभ घेतला.डेल्ला रेसॉर्टचे व्यवस्थापकीय संचालक जिमी मिस्त्री यांच्या संकल्पनेतुन हां उपक्रम राबविण्यात आल होता.वात्सल्यच्या अनाथ मुला-मुलींसाठी हा अविस्मरणीय क्षण ठरला.अनाथ मुलांचे जीवन इतर समाज घटकांप्रमाणे बहरावे असा आमचा प्रयत्न असतो.या उपक्रमामुळे निश्चितच या मुलांना इतर घटकां प्रमाणे आनंद उपभोक्ता आला असेल असे मत फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक स्वाती मुखर्जी यांनी व्यक्त केले.



डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टच्या परिसरात एक दिवसाची सुट्टी आनंदात घालवणारी वात्सल्य फाउंडेशनची मुले.

छाया : श्रीकांत बोरावके